# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १७/०९/२०२४ (मंगळवार) सायंकाळ**

---

## पो.स्टे. नरखेड हद्दीमधील जुगार अड्डयावर धाड

## —: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक १६/०९/२०२४ रोजी पोस्टे नरखेड येथील स्टाफ पोस्टे हद्दीत अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरद्वारे विश्वसनीय खबर मिळाली की, पोलीस स्टेशन नरखेड हद्दीतील हनुमान मंदिराच्या मागे मौजा सारडी शिवार येथे काही लोक ५२ तासपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत असल्याची गोपनिय माहीती पोस्टे नरखेड येथील स्टाफ यांना प्राप्त झाले वरून सदर स्टाफ हनुमान मंदिराच्या मागे मौजा सारडी शिवार येथे सापळा रचुन छापा टाकला असता **आरोपी नामे—१) इरफान ईब्राहिम शहा, वय २३ वर्ष रा काटोल २) राजकुमार धनराज गजबे वय ३६ वर्ष रा. वार्ड क्र ११ नरखेड ३) नसिम रसिद खॉ पठान वय ४० वर्ष रा. वार्ड १५ नरखेड ४) मोहसिन नसिर खॉ पठान वय ३० वर्ष रा. वार्ड १५ नरखेड ५) विजय गणपत ढोरे वय ३२ वर्ष रा. वार्ड क्रं १ नरखेड ६) फरिद बब्बु शहा वय ३१ वर्ष रा. वार्ड १५ नरखेड** हे जुगार खेळतांनी मिळुन आले. एकुण ०६ जुगारी इसम यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन अंगझडतीत नगदी ९००० रूपये व हातात १८ तासपत्ते, डावावर ३४ तासपत्ते किंमती ५० रू तसेच डावावर ३ तास पत्ते कॅट किंमती १५० रू. व डावावर नगदी १५०० रू. एक पांढ—या रंगाची ताडपतरी किंमती ५०० रू., एक काळया रंगाची हिरो स्पेलंडर प्लस क्रं एम.एच. ४० सी.पी. ९६८८ किंमती ६५०००/— रूपये असा एकुण ७६२००/— रूपयाचा मुद्येमाल जप्त करून आरोपीतांविरूध्द पोलीस ठाणे नरखेड येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे नरखेड येथील ठाणेदार सपोनि अजित कदम, पोउपनि देविदास ठमके, पोहवा गजानन तितरे, पोअं जालींदर राठोड, गणेश ताजने यांनी पार पाडली.

# <u>अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद</u>

## <u>पोलीस स्टेशन अरोलीची कार्यवाही</u>

दिनांक १७/०९/२०२४ रोजी पोलीस स्टेशन अरोली येथील स्टाफ अरोली हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरव्दारे खबर मिळाली की, धर्मापुरी ता. मौदा येथे **आरोपी नामे– १) बादल उमाशंकर गाढवे २) निशांत सुरेश ईश्वरकर ३) विक्की युवराज कुथे ४) फरार आरोपी राजेश युवराज कुथे सर्व रा. टाकळी ता. मोहाळी** यांनी संगनमत करून त्याचे ताब्यातील विनानंबरचे जॉन डीयर कंपनीचे ट्रॅक्टर व निळया रंगाचे ट्रॅक्टरने अवैधरित्या रेतीची वाहतुक करतांनी मिळुन आल्याने सदर आरोपीतांच्या ताब्यातून हिरव्या रंगाचा विना नंबरचा मुंडा इंजिन नं PY3029T 24504 कि. ५,००,०००/– रू. व विना नंबरचा निळया रंगाची ट्रॉली १,५०,०००/– रू. व ट्रॅक्टर ट्रॉली मध्ये अंदाजे १ ब्रास रेती कि. ३०००/– रू. आरोपी क्र. २) याचे ताब्यातुन महिंद्रा कंपनीची सॅन्ट्रो एम.एच. ३६ एस.०९८३ कि. ५०,०००/– रू. व विवो कंपनीचा अॅड्रॉइड मोबाईल कि. १०,०००/– रू. तसेच आरोपी क्र. ३) हिरो कंपनीचा स्प्लेंडर प्रो एम.एच.३६ टि ८२४ की. ४०,०००/– रू. व पोको कंपनीचा अॅन्ड्रॉईड मोबाईल कि. ७०००/– रू. असा एकुण ७,७०,०००/– रू मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे– पोशि राकेश राउत पोस्टे अरोली यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीतांविरुध्द कलम ३०३(२), ४९ बी.एन.एस.सह कलम ४८(७),४८(८) म.ज.म.सं. सह.क. ४, २१ खाण आणि खनिज अधि. सह.क. ३ सार्व सं.नु.प्रति अधि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि सुशिलकुमार सोनवने हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे अरोली येथील ठाणेदार सपोनि स्नेहल राउत यांचे नेतृत्वात त्यांचा स्टाफ यांनी केली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**